दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आतील पानात**

- आली दिवाळी... आली दिवाळी...
- मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन...
- जिल्हा परिषदे चे कंत्राटी शिक्षक मानधनाविना...

**आजचा सुविचार**

जो मनुष्य मरायला तयार होतो
तो कधीच मरत नाही...
आणि जो मरायला भितो
तो आधीच मेलेला असतो....
– डॉ.बाबासाहेब आंबेडकर

वर्ष : ०५ | अंक : ६०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१४ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# शरद पवारांनी पत्ते उघडले, आता मोठी राजकीय खेळी...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडायच्या अजून बाकी आहेत. कारण लोकसभा निवडणुका झाल्या, विधानसभा निवडणुका झाल्या, आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला प्रचंड मोठं यश आलं.

पण विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. विशेष म्हणजे या निवडणुकीत महाविकास आघाडीने खूप ताकद लावली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी संपूर्ण राज्यात फिरुन प्रचार केला होता. त्यामुळे निवडणूक ही अत्यंत अटीतटीची आहे, असं दृश्य होतं. पण निकाल हा पूर्णपणे महायुतीच्या बाजूने लागला. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. अर्थात महाविकास आघाडीच्या पराभवाला काही कारणं असू शकतील. पण या पराभवानंतरही ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी हार मानलेली नाही.

शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शड्डू ठोकला आहे. त्यांनी या निवडणुकांसाठी रणनीती देखील आखली आहे. या रणनीतीमुळे आता महाराष्ट्राच्या राजकारणाला आगामी काळात नवं वळण येणार का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. कारण शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पत्ते उघडले आहेत. आगामी निवडणुकांमध्ये ते तरुणांना केंद्रस्थानी ठेवून राजकारण करणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे आता तरुणांना राजकारणात चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे.



**●महाराष्ट्राचं राजकारण वेगळ्या वळणावर जाणार?**

शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज अतिशय महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवार यांनी आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना मोलाच्या सूचना दिल्या आहेत. विशेष म्हणजे यावेळी शरद पवार यांनी मोठी घोषणा केली. राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांमध्ये राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार, अशी मोठी घोषणा अजित पवार यांनी केली आहे. यावेळी त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना राज्यात जास्तीत जास्त तरुणांना कशी संधी देता येईल यासाठी प्रयत्न करा, असे आदेश शरद पवारांनी दिला.

शरद पवार यांनी या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांच्या वक्तव्याचा देखील निषेध यावेळी नोंदवला. तसेच जातीय सलोखा ठेवा. राज्य पातळीवर किंवा स्थानिक पातळीवर बोलत असताना जातीवाचक बोलू नका, प्रेमाची भाषा वापरा, आपल्या वक्तव्याने जातीय सलोखा बिघडणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचना शरद पवार यांनी आजच्या बैठकीत आपल्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या आघाडीत लढायच्या किंवा स्वतंत्र लढायच्या याबाबत चर्चा करण्यासाठी उद्या बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत कुठे कसं लढायचं याबाबत चर्चा करण्यात येईल, अशी माहिती यावेळी शरद पवार यांनी दिली.

## राज्यात १५ ऑक्टोबर पासून वादळी पावसाचा अंदाज



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे. मात्र १५ ऑक्टोबर पासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल अपेक्षित आहे. या तारखे पासून किमान १८ ऑक्टोबर पर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस अपेक्षित आहे.

सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकतं, जिथे या दरम्यान अनेक भागांमध्ये आभाळी हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील. तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## राज्यात रिक्षा भाडे ४० तर टॅक्सी भाडे ५६ टक्क्यांपर्यंत कमी होणार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** राज्यातील ॲप आधारित वाहतूक सेवेत सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्याच्या हेतूने राज्य सरकारने काही दिवसांपूर्वीच नव्या मोटर वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२५ धोरणाची घोषणा केली आहे. परिवहन विभागाचे हे धोरण सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. या धोरणाला काही संघटनांनी विरोधाचा झेंडा दाखविला असतानाच या धोरणाच्या समर्थनार्थ इतर संघटना आता पुढे सरसावल्या आहेत. या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्याची मागणी संघटनांनी निवेदनाच्या माध्यमातून परिवहन विभागाकडे केली आहे. मुख्य म्हणजे, या धोरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, त्याचबरोबर ग्राहकांना त्याचा मोठा फायदा होईल असा विश्वास या संघटनांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या परिवहन विभागाने मोटर वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२५ धोरणाची घोषणा केली. या धोरणाची अंमलबजावणी लवकरच केली जाणार असून याबाबत हरकती आणि सूचना सरकारकडून मागविण्यात आल्या आहेत. या धोरणामुळे ॲप आधारित वाहतूक सेवेमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. रिक्षा भाडे ४० टक्क्यांनी तर टॅक्सी भाडे ५६ टक्क्यांपर्यंत कमी होईल, असा अंदाज वर्तविला जात आहे. त्याचवेळी येत्या सात वर्षात दीड ते तीन लाख रोजगार निर्मिती होईल, असा विश्वासही वर्तविला जात आहे.

या धोरणाबद्दल बाइक टॅक्सी वेल्फअर असोसिएशनच्या महिला विभागाच्या अध्यक्षा सोनाली शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. या नव्या धोरणांमुळे महिला चालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महिला चालकांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी या धोरणाचा फायदा होणार असून बाईक आणि टॅक्सी चालवून घर खर्च भागविण्यास मदत होणार आहे. या धोरणामुळे अनेक बदल होणार असून या बदल होऊ नये म्हणून काही संघटना याला विरोध करीत आहेत, असा दावा सोनाली शिंदे यांनी केला.

असोसिएशनचे कुणाल मोरे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली. सध्या ॲप आधारित बाईक आणि टॅक्सी सेवेमध्ये मोठ्या प्रमाणात युवा वर्ग आहे. या नव्या धोरणामुळे युवा वर्गामध्ये मोठ्या रोजगाराची संधी मिळणार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे सरकारने काही संघटनांच्या विरोधाला न जुमानता या धोरणाची तात्काळ अंमलबजावणी सुरु करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी अधोरेखित आहे. तर त्याचवेळी या धोरणाचा फायदा ॲप बेस आधारित वाहतूक सेवा वापरणाऱ्या ग्राहकांना होणार आहे, असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

## केळीचा ट्रक घेऊन निघालेल्या मजुरांवर काळ कोपला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यात एक भीषण अपघात झाला आहे. या भयानक अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. बुलडाणा जिल्ह्यातील टूनकी गावाजवळ मजुरांनी भरलेला आयशर ट्रक उलटल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेत पाच जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

**▶काय घडला घटनाक्रम?**

बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील टूनकी–सोनाळा रस्त्यावर शनिवारी रात्री सुमारे ९ वाजता एमएच ४८ एवाई ४८१५ क्रमांकाचा केळीने भरलेला आयशर ट्रक जात होता. या ट्रकमध्ये एकूण आठ मजूर बसेलेले होते. अचानक हा ट्रक उलटला आणि या अपघातात दोन मजुरांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार हा केळीने भरलेला ट्रक जळगाव, जामोद–अकोट मार्गाने अंजनगावकडे जात होता. ज्यामध्ये हे आठ मजूरही होते. टूनकी गावाजवळ ट्रक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले अन् हा अपघात झाला. या अपघातातले मजूर व जखमी सर्व मजूर हे अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव गावचे रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच सोनाळा पोलीस तत्काळ घटनास्थळी पोहोचले. गावकऱ्यांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने पलटी झालेल्या ट्रकखाली अडकलेल्या मजुरांना बाहेर काढून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, ट्रकखाली दबल्या गेल्याने दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. हे दोन्ही मजूर अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी गावचे असल्याचे समजते. दरम्यान, या अपघातात आयशर ट्रकचेही मोठे नुकसान झाले आहे.

## टाकळीढोकेश्वर पंचायत समिती गणातून अरुणा खिलारी निवडणुकीच्या रिंगणात

### अरुणा खिलारी या सक्षम महिला नेतृत्वाला मिळतोय भक्कम पाठिंबा...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट सर्वसाधारण महिला तर टाकळी ढोकेश्वर गण नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) आरक्षणानंतर तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून टाकळी ढोकेश्वर पंचायत समिती गणातून खासदार निलेश लंके यांचे कट्टर समर्थक खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी आपल्या पत्नी सरपंच अरुणा खिलारी यांना पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला आहे. आरक्षण जाहीर होताच खिलारी समर्थक सोशल मीडियावर सक्रीय झाले असून आता फिक्स पंचायत समिती सदस्य म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या सरपंच अरुणा खिलारी या आगामी पंचायत समिती निवडणुकीत रिंगणात उतरल्या आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे आरक्षण जाहीर होताच अनेक इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली असून, अरुणा खिलारी यांचे नाव या निवडणुकीच्या चर्चेत आघाडीवर आहे. सरपंच अरुणा खिलारी ३० वर्षांपासून



टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकासाची भक्कम पायाभरणी केली. निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून करोना महामारीच्या काळात बाळासाहेब खिलारी यांनी खासदार निलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. त्यांच्या नेतृत्वशैलीमुळे स्थानिक पातळीवर मजबूत जनसंपर्कचे जाळे निर्माण झाले आहे.

बाळासाहेब खिलारी यांचा सर्वच घटकपक्षांच्या कार्यकर्त्यांशी लोकसंपर्क, राजकीय कसब आणि समाजातील सर्व स्तरात असलेली चांगली प्रतिमा पाहात अरुणा खिलारी यांना टाकळी ढोकेश्वर गणातील भोंद्रे, काकणेवाडी, तिखोल, ढोकी, टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ, गाजदीपूर खडकवाडी, मांडवे खुर्द, देसवडे, या गावातील आजी – माजी सरपंच सदस्य चेअरमन संचालक यांचा खंबीर पाठिंबा दिला असून सरपंच अरुणा खिलारी यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

**निष्ठा व सक्रीय योगदान...**

सरपंच अरुणा खिलारी यांचे पती बाळासाहेब खिलारी हे गेली कित्येक वर्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या माध्यमातून व खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. पक्षात फूट पडल्याच्या काळातही त्यांनी पक्षाशी निष्ठा राखत काम सुरू ठेवले. महाविकास आघाडीच्या प्रत्येक निवडणुकीत त्यांनी पक्षाची भूमिका ठामपणे मांडण्याची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

लोकसभा निवडणुकीत खासदार निलेश लंके, तर विधानसभेला माजी सदस्या राणीताई लंके या महाविकासआघाडीतील उमेदवारांच्या प्रचारासाठी त्यांनी तळागाळापर्यंत पोहोचून काम केले होते. त्यामुळे पक्षांतर्गत तसेच महाविकासआघाडीतील इतर नेत्यांमध्येही त्यांचा विश्वासार्ह नेत्या म्हणून लौकिक निर्माण झाला आहे.

**टाकळी ढोकेश्वर गणात संपर्क मोहिमेला गती...**

सध्या अरुणा खिलारी या टाकळी ढोकेश्वर गणातील जनसंपर्क मोहिमेला गती देत आहेत. स्थानिक महिला, युवक, आणि विविध सामाजिक घटकांशी गाठीभेटी, संवाद व कार्यकर्त्यांशी बैठकांचे सत्र सुरु आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांना व समाजकार्यातील सक्रिय सहभागाला स्थानिक नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसतो आहे.

**महाविकास आघाडीची जागावाटप आणि चर्चा...**

आरक्षण जाहीर झाल्यानंतर महाविकास आघाडीमधील नेत्यांशी समन्वय साधून जागावाटपाची चर्चा झाली आहे. वरिष्ठांनी या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पक्षाने टाकळी ढोकेश्वर गणाची जागा लढण्याची तयारी दर्शवली असून,महाविकास आघाडीमधील नेत्यांनाही याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे अरुणा खिलारी यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे सभापतीपद महिलेला असल्यामुळे त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता अधिकच बळावली आहे.

## मुल तालुक्यातील अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार दिलासा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** राज्य शासनाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजी अतिवृष्टी आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष मदत व सवलतींचे पॅकेज जाहीर केले होते. प्रारंभी या आदेशात चंद्रपूर जिल्ह्यातील मुल तालुका समाविष्ट नव्हता. ही बाब लक्षात येताच आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तात्काळ शासनस्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या तातडीच्या प्रयत्नांनंतर केवळ काही तासांतच शासनाने सुधारणा करून १० ऑक्टोबर रोजी नवीन शासनादेश काढत मुल तालुक्याचाही समावेश केला आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आ. मुनगंटीवार यांनी दिलेला शब्द काही तासांतच पूर्ण करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांप्रती आपली संवेदनशीलता दाखवून दिली आहे. आ. मुनगंटीवार यांच्या संवेदनशीलतेमुळे आणि कार्यतत्परतेमुळे मुल तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी ही मोठी दिलासादायक बातमी ठरली आहे. मुल,पोंभुर्णा , बल्लारपूर, चंद्रपूर तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी जाहीर केलेल्या विशेष मदत पॅकेजचा थेट लाभ मिळणार आहे. राज्य शासनाने जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात सवलती जाहीर केल्या आहेत.

शासन आदेशानुसार जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जांच्या वसुलीला एक वर्षाची स्थगिती, वीज बिलात तिमाही माफी तसेच दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क व शैक्षणिक फीमध्ये माफी अशा अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. यासोबतच खरीप हंगाम जून ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरींचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घरांची पडझड, घरातील साहित्याचे नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. यासाठी नुकसान भरपाई शासनाकडून दिली जाणार आहे. राज्यभरातील विविध तालुक्यांप्रमाणेच आता मुल तालुकाही आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आला असून, या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शासन आदेशात स्पष्ट नमूद केल्याप्रमाणे या सवलतींचा थेट लाभ चंद्रपूर जिल्ह्यासोबतच मुल तालुक्यातील शेतकऱ्यांनाही मिळणार आहे. ही सकारात्मक घडामोड म्हणजे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सतत झटत राहणे हीच त्यांची कार्यसंस्कृती असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. या निर्णयाबद्दल शेतकरी बांधवांकडून आ. मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.

# संपादकीय



## ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनर्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे.

ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

# आली दिवाळी.. आली दिवाळी...

आता दिवाळी काहीच दिवसावर आहे. त्यामुळे बाजार पेठा फुललेल्या आहेत.. रंग, रांगोळ्या, आकाश दिवे, फटाके, फराळाचे पदार्थ, झेंडूची फुले, शेवंतीच्या वेण्या, गजरे, दाराची तोरणे, आदी गोष्टींची बाजारपेठेत रेलचेल आहे. घर, वस्तू, वाहन, खरेदी साठी बुकिंग सुरु आहे.. नाट्यगृह, सिनेमागृह, हॉटेल्स, मॉल्स, या ठिकाणी गर्दी बघायला मिळत आहे. रस्ते अक्षरशः वाहू लागले आहेत.



दिवाळी म्हणजे आनंदोत्सव. मनाला आनंद यातून मिळत असतो. दिवाळी म्हणजे फराळ, फटाके, कपडे खरेदी, वाचनासाठी दिवाळी अंक, अर्थात साहित्य फराळ. एकमेकांच्या गाठीभेटी. दिवाळी निमित्ताने आणि दिवाळी पर्यटन स्थळी साजरी करण्याचे बेत आखले गेले आहेत. पर्यटन स्थळेही सज्ज झाली आहेत. काही ठिकाणी तर बुकिंग फुल्ल झाले आहे.

साधारणपणे कराष्टमी पासूनच दिवाळीची सुरुवात होते असे म्हणायला हरकत नाही. कारण त्याच दिवशी अनेकघरांवर विद्युत रोषणाई करुन आकाश दिवे लावले जातात.रात्री लक्ष्मी ची पुजा करतात. लहानपणी आम्ही पण घरीच आकर्षक दिवा बनवत होतो. आपण आकाशदिवा बनवल्याचा खूप आनंद व्हायचा. त्या गोष्टीला पंचेचाळीस पन्नास वर्षाचा काळ लोटला. त्यावेळी बहुतेक ठिकाणी आकाश दिवे हे घरीच बनवले जात होते. पंधरा दिवस आधी हा कार्यक्रम सुरु व्हायचा. एक वेगळाच आनंद असायचा. परंतु आता गतिमान जीवनात कोणाला वेळ नाही, आणि बाजारात निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक आणि त्यात विजेची दिवे लावून मिळतात. तसेच वेगवेगळ्या प्रकारात, रंगाचे असतात, त्यामुळे आता घरी कोणीच आकाश दिवे बनवत नाहीत.

हीच परिस्थिती फराळाची आहे काही वर्षापूर्वी घरोघरी चकली, अनारसे, करंज्या, शेव, चिवडा, लाडू, हे पदार्थ महिलावर्ग घरीच बनवायचे. तळणाचा वास असायचा. परंतु आता बदलत्या परिस्थितीत अनेक ठिकाणी हे पदार्थ तयार करून त्याच्या दिवाळीआधी ऑर्डर स्वीकारल्या जातात. काही ठिकाणी हे पदार्थ बनवून देणारे कारागीर अपार्टमेंटमध्ये जाऊन महिलावर्गाला फराळाचे पदार्थ मजुरी घेऊन बनवून देतात. त्यामुळे दिवाळी आधीच आठ दिवस अशा कारागिरांकडे महिलांची रांग लागलेली असते. तर दुसरीकडे बाजारपेठेत फराळाच्या दुकानांची खूप मोठ्या प्रमाणात स्टॉल्स उघडलेली असतात, आणि माफक दरात त्याची विक्री होत असते. असे काही बदल काळानुसार होऊन आता घरी दिवाळीचे पदार्थ बनवायची प्रथा पद्धत कमी झाली आहे. अगदी तुरळक प्रमाणात काही महिला ते घरी बनवतात. ऑनलाईन बहुतेक गोष्टी घरपोच मिळू लागल्या आहेत. तिकडे कल वाढलाय.

दिवाळी चा काळ तसा सहाच दिवसाचा.गोवत्स/वसू बारस, धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, आणि भाऊबीज.

दिवाळीचा हा पाच- सहा दिवसांचा काळ म्हणजे एक आनंद पर्वणी असते. अशाप्रकारे हे उत्सव -सण हे एकूणच मनाला आनंद देऊनच वर्षभर यातून ऊर्जा उत्साह मिळत असतो. यामागे जसे सांस्कृतिक, धार्मिक अध्यात्मिक, महत्व आहे तसेच या सर्व उत्सव-सणामागे वैज्ञानिक महत्व सुद्धा आहे. आपण या दिवसांची आतुरतेने वाट पाहत असतो. आणि बघा, आपण वर्षभरात हे सर्व पदार्थ खात असतो, परंतू ऐन दिवाळीच्या दिवसात बनवलेल्या चकल्या, शेव, चिवडा, अनारसे, शंकरपाळे, यांची चव काही वेगळीच असते. म्हणूनच- नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजनाचे दिवशी अभ्यंगस्नाना नंतर चकली बरोबर चहा, सोबतीला हातात आवडता दिवाळी अंक म्हणजेच साहित्यिक फराळही, गुलाबी थंडी, ही मजा काही औरच असते, ती दिवाळीतच अनुभवायला मिळते...ऐन दिवाळीत, दिवाळी पहाट..पाडवा पहाट...



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

सारखे कार्यक्रमाचे आयोजन होते. आताही अनेक मोठ्या शहरांमध्ये होणार, त्याच्या जाहिराती वृत्तपत्रातून आपण वाचतोय.

आपल्या महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे खूप सारे नुकसान झालेले आहे. अनेकांची घर वाहून गेली, शेतीमालाचे अतोनात नुकसान झाले आहे.. त्यामुळे तसे वातावरण खूप असं आनंददायी नाही. अजून सरकारी मदत जमा झालेले नाही. शेतकरी आतुरतेने वाट बघत आहे.

दिवाळी सण हा असा आहे त्याला कोणी थोपवू शकणार नाही. किंवा त्याच्यावर बंदी ही शक्य नाही. तरीपण आपलही एक कर्तव्य म्हणून प्रत्येकाने अशा संकटकाळी आपल्या खर्चातील काही खर्च कमी करून तो यासाठी निधी म्हणून द्यायला हवा हे मात्र आपण प्रत्येक जण करू शकतो. ते आपल्या हाती आहे.

दिवाळी सण साजरा करताना सुरक्षिततेच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने काही गोष्टी लक्षात ठेवणे हे महत्त्वाचे आहे. ती म्हणजे प्रदूषण आणि फटाक्यापासून होणारे ध्वनि प्रदूषण- वायू प्रदूषण ही तर महत्वाची कारणे आहेतच. परंतु नेहमी त्यातून होणारे धोके व इजा त्यामुळेच याबाबतीत खबरदारी घेतली तर आपली दिवाळीही, आरोग्यदायी, आनंदायी होऊ शकणार आहे. आता पणत्यांची आरास, झेंडूची फुलांची आरास करा. फुलांची आरास खूपच सुंदर असते. शक्य तेवढा प्लास्टिक फुलांचा वापर टाळावा.

सनईच्या सुरात होणारी पहाट. सुगंधी उटण्याने स्नानाचा थाट, पंगतीला फराळ. आवडत्या माणसांचा सहवास, फुलबाज्या, फटाके आतशबाजी.. आमच्या घरी अन तुमच्या घरी..

दिवाळी येणार.. अंगण सजणार. आनंद फुलणार घरोघरी..

दिवाळी कोणाचीही असो श्रीमंताची असो वा गरिबांची आनंद देणारीच असते.

दिवाळी मनातही असते. घरातही असते.आकाशकंदील. रांगोळी. पक्वान्ने, सजावट, फटाक्यांची आतशबाजी, साहित्याची मेजवानी यात आपण ती शोधत असतो. पण खरी दिवाळी असते आपल्या मनामनात. आपल्याला एकमेकांच्या बद्दल वाटणाऱ्या प्रेम. आपुलकी. स्नेह, आणि मायेत.

**ही दिवाळी सर्वांना आरोग्यदायी, आनंददायी, सुख-समाधानाची जावो.**
**।। दिवाळी साठी।खूप शुभेच्छा ।।**

# वाचक पत्र

## मुलांना गड किल्ले बांधण्यास प्रोत्साहन द्या !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळ्यांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे. प्रत्येक गड किल्ल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्लयाने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत.



छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बारा गडकिलयांचा यंदा यूनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश करण्यात आला आहे ही महाराष्ट्रासह जगभरातील शिवप्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे. शिवरायांच्या पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या आधी किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली. दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला, तरी त्यानिमित्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते. उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात.

त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते. हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा मोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्यामध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

**- सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

## भेटी गाठी..

दिवाळीची धामधूम
वाढल्या भेटी गाठी
कार्यालयात झुंबडी
प्रदान कराव्या भेटी

खुशकरे एखाद्याला
लपले फायद्यासाठी
उंचीमहागड्या वस्तू
लाचखोरी लपे पाठी

ड्राय फ्रूट चॉकलेटस्
भर गच्च सुरेख पेटी
न कळत बोटां मध्ये
घालावीसुवर्णअंगठी

दिवाळीअंक पुस्तके
रेलचेल चालते मोठी
कोंबतो नोटांची गड्डी
कडाडून मारत मिठी

रे देतानाशुभेच्छापत्रे
गरम करायच्या मुठी
पाहती सुखे सोहळा
रे बुध्दी ज्यांची नाटी

लाचेला गोंडस रुपडे
मारायच्या गळा भेटी
करून घ्यायची कामे
अधिकारी धरावेवेठी

पवित्र सण भिन्न गण
बुध्दी कशी उरफाटी
दिसे हसमुखसदिच्छा
रे अपेक्षाराक्षसी पाठी

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# यादव नगर येथील झोपडपट्टीवर कारवाई !

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१३, ऐरोली (नवी मुंबई) :**

महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात अनधिकृत झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिका जी विभाग ऐरोली कार्यक्षेत्रातील यादवनगर, नमुंमपा शाळा क्र.७७ च्या बाजूला मलनिसारण केंद्र (एसटीपी प्लांट) करिता प्रस्तावित भूखंडावर अनधिकृतपणे झोपड्या उभारण्यात आलेल्या होत्या.

सदर भूखंडावरील अनधिकृत झोपड्या सुनिल काठोळे, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे



आयोजन करुन निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. सदर मोहिमेसाठी जी- विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मजूर, जेसीबी, डंपर, तसेच अतिक्रमण विभागाचे पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## निफाड पंचायत समिती गणांचे आरक्षण जाहीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**




**दि.१३, विंचूर (नाशिक) :** निफाड पंचायत समिती सभापती पद यापूर्वीच अनु.जमाती महिलेसाठी राखीव झाले आहे. सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी निफाड प्रांत कार्यालयात प्रांताधिकारी शशिकांत मंगरुळे यांचे अध्यक्षतेखाली व तहसिलदार विशाल नाईकवाडे, नायब तहसिलदार राहुल मुळीक यांचे उपस्थितीत निफाड पंचायत समिती गणांचे आरक्षण काढण्यात आले. आरक्षित जागांचे आरक्षण लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने तर जनरल जागेचे आरक्षण राजविर येवले या ४ वर्षीय बालकाच्या हातून चिट्ठी पद्दतीने काढण्यात आले. एकूण १६ गणांपैकी लासलगाव गणात अनु.जाती प्रवर्गातील सर्वाधिक ३५६९ मतदार असल्याने लासलगाव हा गण अनु जाती (महिला) प्रवर्गासाठी जाहीर झाला आहे.

कोकणगाव गणात ८१४७, कोठूरे गणात ६८५६ तर कसबे सुकेणे गणात ६८२९ मतदार अनु.जमाती प्रवर्गातील असल्याने हे तिन्ही गण या प्रवर्गासाठी निश्चित झाले आहेत. चिट्ठी पद्दतीने कोकणगाव व कसबेसुकेणे गण याच प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. तर इतर प्रवर्गातील चिट्ठी पद्दतीने नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी करंजगाव (महिला), विंचुर (महिला), पिंपळस, चांदोरी तर सर्वसाधारण जागेसाठी पालखेड, नांदुर्डी (महिला), टाकळी विंचुर, डोंगरगाव, उगाव (महिला), सायखेडा, नांदूरमध्यमेश्वर, देवगाव (महिला) असे निश्चित झाले आहे. याबाबत दि.१४ ते दि.१७ पर्यंत सूचना व हरकतीसाठी वेळ देण्यात आला असल्याची माहिती प्रांत शशिकांत मंगरुळे यांनी दिली.

## पालम पंचायत समितीचे गण निहाय आरक्षण जाहीर

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**




**दि.१३, पालम (परभणी) :** आगामी काळात होऊ घातलेल्या पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी तहसील कार्यालयातील सभागृहात उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या अध्यक्षतेखाली पालम पंचायत समिती गणनिहाय आरक्षण सोडत जाहीर झाली. पंचायत समितीच्या एकूण आठ गणा ची सोडत जाहीर झाली. यामध्ये ८७ रावराजुर - नागरिकांचा मागास प्रवर्ग, ८८ फरकंडा- सर्वसाधारण, ८९ पेठशिवनी - सर्वसाधारण महिला, ९० पेठ पिंपळगाव - अनुसूचित जाती महिला , ९१ चाटोरी - नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ९२ आजमाबाद - सर्वसाधारण महिला, ९३ बनवस - सर्वसाधारण, ९४ तांदुळवाडी - सर्वसाधारण. अशाप्रकारे आरक्षण सोडत जाहीर झाली. या दरम्यान तहसीलदार उषा किरण शृंगारे, गटविकास अधिकारी उदय सिसोदे, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार विनोद पवार यांनी कामकाज पाहिले. यावेळी राजकीय पक्षाचे पुढारी, पदाधिकारी, पत्रकार व तालुक्यातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## श्री शिवाजी विद्यालय येथे पालक सभा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१३, बुलडाणा :** स्थानिक श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे नुकतीच शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील द्वितीय पालक सभा संपन्न झाली. सदर सभेचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद कावरे हे होते. सदर सभेमध्ये नवनियुक्त पालक प्रतिनिधी प्रताप खरात व आरती राठोड व इतर पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या सर्व पालकांचे शाळेच्या वतीने गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच सदर सभेच्या माध्यमातून विद्यालयाच्या पालक सीमा जाधव, सागर वाकेकर, सौ.गोरे, श्री.पाटील यांनी आपले विचार व्यक्त करताना विद्यालयाच्या सकारात्मक प्रगती विषयी प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालयात राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाची प्रशंसा केली. तसेच शाळेची विद्यार्थिनी कुमारी पल्लवी ठाकरे हिची आर्चरी या खेळ प्रकारामध्ये विभागीय स्तरावर निवड झाली. या निमित्ताने तिचे व तिच्या पालकाचे गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक भाषणामध्ये शाळेचे पर्यवेक्षक गजेंद्र राजपूत यांनी द्वितीय सत्रासाठी प्रयोजित शालेय उपक्रमाविषयी माहिती दिली. तसेच अध्यक्षीय भाषणामध्ये शाळेचे मुख्याध्यापक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगामध्ये यशस्वी होण्यासाठी कशाप्रकारे तयारी करावी, व यासाठी शाळेमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा याविषयी माहिती देत विद्यार्थी शिक्षक व पालक यांनी याविषयी जागरूक राहावे. असे प्रतिपादन केले तसेच सहाय्यक शिक्षक मनोज चव्हाण यांनी देखील शाळेत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधा विषयी माहिती दिली. सदर पालक सभेसाठी विज्ञान विभाग प्रमुख योगेश भोंडे, एच.एस.व्ही.सी, विभागप्रमुख पंढरी वाघ तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन श्री.पालकर तर आभार प्रदर्शन सौ.हिंगे यांनी केले.

## विंचूर डिजिटल मीडियाच्या' अध्यक्षपदी राजेश भडांगे तर उपाध्यक्षपदी मच्छिंद्र साळुंके

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** विंचूर शहर डिजिटल मीडिया संघटनेच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली असून, अध्यक्षपदी दैनिक युवक आधारचे निफाड तालुका प्रतिनिधी पत्रकार राजेश भडांगे तर उपाध्यक्षपदी दैनिक पुढारीचे पत्रकार मच्छिंद्र साळुंखे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीप्रसंगी डिजिटल माध्यमाशी संलग्न सर्व पत्रकार उपस्थित होते. विशेषतः सुनिल क्षिरसागर, दत्तात्रय दरेकर, अभय पाटील, जनार्दन चव्हाण, संदीप धनवटे, रोहन सरोदे आदी पत्रकारांनी उपस्थित राहून नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. संघटनेचे मावळते अध्यक्ष सुनील क्षीरसागर यांनी एक वर्षांच्या रोटेशन पद्धतीनुसार आपल्या पदाचा कार्यकाळ पूर्ण करून अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या कार्यकाळात संघटनेने डिजिटल माध्यम क्षेत्रात प्रभावी कामगिरी बजावली असून, त्यांच्या जागी सर्वानुमते राजेश भडांगे यांची नवीन अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. डिजिटल पत्रकारांच्या संघटित शक्तीमुळे स्थानिक बातम्यांना नवे व्यासपीठ मिळावे, तसेच सामाजिक विषयांवर जनजागृती व्हावी, या उद्देशाने नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली आहे. या निवडीबद्दल दोन्ही पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जिल्हा परिषदेवर महिलांचे वर्चस्व राहणार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक करीता सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन येथे जिल्हा परिषदेच्या ५६ गटासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील ८ पैकी ४, अनुसूचित जमाती प्रवर्गातील १३ पैकी ७, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील १५ पैकी ८ आणि सर्वसाधारण प्रवर्गातून २० पैकी ९ अशा एकूण ५६ पैकी २८ जागा महिलांसाठी राखीव करण्यात आल्या आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर जिल्हा परिषद अध्यक्ष पद अनुसूचित जाती महिला राखीव असल्याने ही संधी गोंडपिपरी, चंद्रपूर, चिमूर, राजुरा तालुक्यातील निवडून येणाऱ्या महिलेला मिळणार आहे.



**आरक्षण सोडतीत ५६ पैकी २८ जागा राखीव**

आजच्या आरक्षण सोडतीतून पुन्हा एकदा महिलांचे वर्चस्व दिसून येत आहे. जिल्हा परिषद गटांच्या आरक्षणात चिमूर तालुक्यातील आंबोली - सावरगांव एसटी महिला, शंकरपूर - डोमा एससी महिला, नवतळा - नेरी एसटी सर्वसाधारण, गदगांव - खडसंगी एसटी महिला, मासळ बु. - पळसगाव एसटी सर्वसाधारण असे आरक्षण आहे. नागभीड तालुक्यात कानपा - मौशी ओबीसी महिला, पारडी - बाळापूर बुज., ओबीसी सर्वसाधारण, गोविंदपूर -तळोधी बा., सर्वसाधारण महिला, गिरगांव - वाढोणा सर्वसाधारण असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. ब्रम्हपुरी तालुक्यात नान्होरी - अर्हेर नवरगांव ओबीसी सर्वसाधारण, पिंपळगाव - मालडोंगरी ओबीसी सर्वसाधारण, खेडमक्ता - चौगान सर्वसाधारण, गांगलवाडी - मेंडकी सर्वसाधारण, आवळगांव - मुडझा सर्वसाधारण असे आरक्षित झाले आहे. सिंदेवाही तालुक्यात नवरगांव - पळसगाव जाट सर्वसाधारण महिला, गुंजेवाही - सरडपार ओबीसी सर्वसाधारण, रत्नापूर - शिवणी सर्वसाधारण, मोहाळी नलेश्वर - वासेरा एसटी महिला असे आरक्षण आहे. भद्रावती तालुक्यात चंदनखेडा - मुधोली एसटी महिला, सांगली - नंदोरी सर्वसाधारण, कुचना - शिवजीनगर एससी सर्वसाधारण, कोंढा - घोडपेठ ओबीसी सर्वसाधारण हे आरक्षण आहे. वरोरा तालुक्यात खांबाडा - चिकणी सर्वसाधारण महिला, टेमुर्डा - आबमक्ता एसटी सर्वसाधारण, नागरी - माढेळी ओबीसी महिला, चरूरखटी - सालोरी ओबीसी महिला, शेगांव बु. - बोर्डा सर्वसाधारण असे आरक्षण जाहीर केले आहे. चंद्रपूर तालुक्यात दुर्गापूर एससी महिला, जुनोना एसटी सर्वसाधारण, कोंडीमाल एससी सर्वसाधारण, पडोली एससी सर्वसाधारण, नकोडा ओबीसी सर्वसाधारण असे आरक्षण काढण्यात आले. मूल तालुक्यात राजोली - मारोडा ओबीसी सर्वसाधारण, जुनासुर्ला - बेंबाळ ओबीसी महिला, चिंचाळा मो. - सुशी दाबगांव सर्वसाधारण असे आरक्षण आहे. सावली तालुक्यात अंतरगांव - निमगाव सर्वसाधारण महिला, पाथरी - व्याहाड खुर्द ओबीसी महिला, बोथली - कवठी सर्वसाधारण, व्याहाड बुज - हरंबा सर्वसाधारण असे आरक्षण निश्चित करण्यात आले. पोभूर्णा तालुक्यात देवाडा खुर्द - केमारा एसटी सर्वसाधारण, चिंतलधाबा - घोसरी सर्वसाधारण महिला, गोंडपिपरी तालुक्यात करंजी - खराळपेठ सर्वसाधारण महिला, विठ्ठलवाडा - भंगाराम तळोधी ओबीसी महिला, तोहगांव - धाबा एससी महिला असे आरक्षण आहे. बल्लारपूर तालुक्यात विसापूर - बामणी सर्वसाधारण महिला व कोठारी - पळसगाव गटात सर्वसाधारण महिला असे आरक्षण आहे. कोरपना तालुक्यात भोयेगांव - आवाळपूर सर्वसाधारण, उपरवाही - नांदा ओबीसी महिला, वनसडी - कोडशी बु. सर्वसाधारण महिला, परसोडा - येरगव्हाण एसटी महिला असे आरक्षण आहे. जिवती तालुक्यात चिखली बु. - शेणगांव एसटी महिला, येल्लापूर - कुंभेझरी एसटी सर्वसाधारण, तर राजुरा तालुक्यात गोवरी - धोपटाळा एससी महिला, चुनाळा - विरुर स्टेशन एससी सर्वसाधारण, रामपूर - पाचगाव ओबीसी महिला व देवाडा - भेंडवी एसटी महिला असे आरक्षण जाहीर करण्यात आले.

# जिल्हा परिषदेचे कंत्राटी शिक्षक मानधनाविना

## निवेदन देऊनही गणपती - दसऱ्याप्रमाणे दिवाळी ही जाणार अंधारात...?



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१३, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्हा परिषदेमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांना जून महिन्यापासून कामावर रुजू झालेले जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ५०० हून अधिक कंत्राटी शिक्षकांना अद्याप मानधन मिळालेले नाही. मागील ५ महिन्यांचे मानधन न मिळाल्याने शिक्षकांपुढे आर्थिक संकट निर्माण झाले असून, आता दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात ही हे शिक्षक आर्थिक अंधारात जाण्याची वेळ येत आहे. भाडोत्री शिक्षकांचे भाडे थकले असून, अनेक शिक्षक बाहेर जिल्ह्यांमधून पालघर जिल्ह्यात आलेले आहेत. त्यांच्या राहण्याची, प्रवासाची आणि दैनंदिन गरजांची तजवीज करण्यास अडचणी येत आहेत. यामुळे या शिक्षकांनी आपल्या प्रलंबित मानधनाबाबत निवेदन सादर करून प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

शिक्षकांच्या वतीने पालघर जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे देण्यात आलेल्या निवेदनात सांगितले आहे की, निवडणुका, गणपती आणि दसरा सण गेल्यावरही आता दिवाळी जवळ आली आहे, मात्र मानधन मिळालेले नाही. अशा स्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

यावेळी शिक्षक प्रतिनिधींनी निवेदन देताना सांगितले की, प्रशासनाकडून वेळोवेळी आश्वासने दिली जात आहेत, पण प्रत्यक्षात काहीच झाले नाही. आम्ही कामावर नियमित उपस्थित राहूनही मानधनासाठी दरमहिना भटकंती करावी लागत आहे. दरम्यान, शिक्षण विभागाकडून शिक्षकांचे मानधन लवकरच मंजूर होईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्षात निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही झाल्याशिवाय शिक्षकांचा दिवाळी सण अंधारातच जाण्याची शक्यता आहे.

# माळकौठा पंचायत समिती गणातील अनुसूचित जाती प्रवर्गाची उपेक्षा कायमच

## आरक्षणात अनवधानता की नियोजनाचा अभाव?

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात ४ पंचायत समिती गणांचे आरक्षण घोषित करण्यात आले असले तरी आरक्षण सोडत प्रक्रियेत सामाजिक न्यायाच्या कल्पनांवरच पाणी फिरल्याची भावना जनतेतून व्यक्त केल्या जात आहे. विशेषता माळकौठा पंचायत समिती गणातील अनुसूचित जाती प्रवर्गावरील अन्याय पुन्हा एकदा या निमित्ताने अधोरेखित झाला आहे. सन २००२ मध्ये स्थापन झालेल्या तालुकास्तरीय पंचायत समितीला तब्बल २३ वर्षे पूर्ण होत आली, मात्र आजवर एकदाही माळकौठा हा पंचायत समिती गण अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जाती महिलेसाठी आरक्षित करण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे, या गणात अनुसूचित जातीची लक्षणीय संख्या असून सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर झालेल्या आरक्षण प्रक्रियेत माळकौठा पंचायत समिती गण सर्वसाधारण प्रवर्गासाठीच आरक्षित ठेवण्यात आला.

एकीकडे जिल्हास्तरावर झालेल्या सभापती पदाच्या आरक्षण सोडतीत मुदखेड पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जमाती महिलेसाठी आरक्षित केल्या गेले, परंतु या तालुक्यांतील चार पंचायत समिती गण स्तरावर अनुसूचित जमाती महिलांकरिता आरक्षणाचा अभाव हा सामाजिक न्यायाच्या तत्वांना हरताळ फासणारा प्रकार ठरला आहे. प्रशासनाच्या दाव्यानुसार, सन २०११ च्या जनगणनेनुसार व निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार जि.प.गट पंचायत समिती गणातील एकूण अनुसूचित जाती जनसंख्या लक्षात घेता, आरक्षण संधी दुसऱ्या गणांना देण्यात आली आहे. परंतु असे करताना माळकौठा सारख्या पंचायत समिती गणाची सातत्याने होणारी उपेक्षा ही बाब नित्याचीच बनली आहे. त्यामुळे सामाजिक समतेचा गजर करणाऱ्या यंत्रणेचा खरा चेहरा उघड होत आहे, अशी टीका आता खुलेआमपणे व्यक्त होऊ लागली आहे.

अनुसूचित जमातींच्या महिला उमेदवारांसाठी पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्वसाधारण प्रवर्गातून विजय मिळविणे अत्यंत कठीण आहे हे सत्य असतानाही, निवडणूक आयोग व प्रशासकीय यंत्रणेला याची जाणीव न होणे, ही सामाजिक भानशून्यता दर्शवते एकीकडे पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण अनुसूचित जमाती महिलांकरिता आरक्षित केल्या जाते परंतु तालुक्यांतील चार पंचायत समिती गणपैकी एकही पंचायत समितीचा गण अनुसूचित जमाती महिलांकरिता आरक्षित केल्या गेला नाही हा मात्र तूर्तास संशोधनाचा विषय आहे. दरम्यान, या आरक्षण प्रक्रियेत बारड पंचायत समिती गण हा नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी निवघा पंचायत समिती गण सर्वसाधारण मुगट अनुसूचित जाती महिलांसाठी आणि माळकौठा पंचायत समिती हा गण सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आला आहे.




या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, जनप्रतिनिधी, पत्रकार आणि रहिवाशी यांच्यात तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. प्रशासकीय यंत्रणेकडून सामाजिक संवेदनशीलता आणि प्रतिनिधित्वाचा समतोल राखणे अपेक्षित असते. परंतु आरक्षणाच्या या सोडतीत तो पूर्णतः ढासळल्याचे स्पष्ट दिसते. या प्रकरणी अपील करण्याचा मार्ग खुला असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे, मात्र अशा चुका घडू नयेत यासाठीच आरक्षण प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सामाजिक वास्तवाशी सुसंगत ठेवणे अत्यावश्यक आहे. मुगट पंचायत समिती गणाला दुसऱ्यांदा अनुसूचित जातीचे आरक्षण कसे काय सुटते हाही विषय चर्चेला जात आहे. आरक्षण सोडत प्रक्रिया भोकरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार डॉ.आनंद देऊळगावकर, निवडणूक विभागाचे कर्तव्यदक्ष नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, संतोष कामठेकर ,मारोतराव जगताप, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी भीमराव पाटील कल्याणे माजी सभापती शत्रुघ्न पाटील शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख संजय पाटील कुरे, पोलीस पाटील पंडितराव चव्हाण, तुळशीराम चूकेवाड सचिन पाटील मगरे वाई चे माजी सरपंच राजेश इंजेवाड बालाजी जंगीलवाड यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सामाजिक आरक्षण म्हणजे केवळ आकडेमोड नव्हे, ती सामाजिक न्यायाची मूळ भावना आहे. ती जर पायदळी तुडवली जात असेल, तर आरक्षण ही संकल्पनाच मूळ अर्थहीन ठरते. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेने सदर आरक्षण सोडतीच्या बाबतीत माळकौठा पंचायत समिती गणाचा फेरविचार करून व अनुसूचित जमाती महिलांकरिता पंचायत समिती सभापती पद आरक्षित ठेवल्यामुळे सदर आरक्षण सोडत प्रक्रिया नव्याने राबविण्यात यावी अशी मागणी वाईचे माजी सरपंच राजेश इंजेवाड, पत्रकार संजय कोलते उत्तम हनुमंते ,यांच्यासह अनेकांनी केली असून या आरक्षण सोडत प्रक्रिये बाबत जिल्हा प्रशासनाकडे अपील दाखल करून न्याय मिळविणार असल्याचे देखील वाईचे माजी सरपंच राजेश इंजेवाड यांनी यानिमित्ताने बोलताना स्पष्ट केले.

# पाटण पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठीची गणनिहाय जाहीर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण (सातारा) :** पाटण पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठीची गणनिहाय १४ गणांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता काळोली, ता.पाटण येथील लोकनेते बाळासाहेब देसाई कृषी संकुलात पाटणचे उपविभागीय अधिकारी सोपान टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व तहसीलदार अनंत गुरव, पाटणचे पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर, सपोनि भुजबळ, नायब तहसीलदार पंडीत पाटील व विजय पाटील यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या २०२५ च्या निकषानुसार गोकूळ तर्फे हेळवाक या गणात अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सर्वात जास्त लोकसंख्या असल्याने या एका जागेचा आरक्षण सोडत लोकसंख्येच्या प्राधान्यक्रम निकषानुसार काढण्यात आली. मागील वेळी गोकूळ तर्फ हेळवाक येथे अनुसूचित जाती प्रवर्ग राखीव पुरूष सर्वसाधारण असे आरक्षण होते. ते बदलून महिलांना प्राधान्य क्रम देण्यात आला.

यावेळी लहान मुलांच्या हस्ते चिट्ठीद्वारे आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने नागरीकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी चाफळ व सणबूर हे दोन गण महिलांसाठी आरक्षित झाले. तर नाडे गण पुरुषांसाठी आरक्षित झाला. सर्वसाधारण प्रवर्ग महिलांसाठी मारूल हवेली, येराड, मल्हारपेठ व मुरूड हे चार गण आरक्षित झाले. तर मंद्रुळकोळे, तारळे, नाटोशी, कुंभारगाव, काळगाव, म्हावशी हे गण सर्वसाधारण पुरूषांसाठी आरक्षित झाले.

५० टक्के आरक्षण हे महिलांसाठी असल्याने पाटण पंचायत समिती १४ गणांपैकी ७ जागांवर महिलांना प्राधान्य देत सोडत काढण्यात आली. मल्हारपेठ, मारूल हवेली या अटीतटीच्या आणि महत्वाच्या गणांत पुरूषांच्या ठिकाणी महिला आरक्षित झाल्याने येथे पुरूषांच्या अपेक्षांवर पाणी फिरले. तर स्वतःसाठी नाही तर आपल्या कुटुंबातील



महिलांसाठी पक्षश्रेष्ठींकडे वशिला लावण्याचे मनसुबे त्यावेळी अनेकांनी बोलून दाखवले.

आरक्षण सोडत यशस्वी करण्यासाठी मंडल अधिकारी रंगनाथ असवले, शरद दुधाळ, ढवळे, ग्राम महसूल अधिकारी प्रशांत सुतार आदींसह महसूल सेवकांनी परिश्रम घेतले. आरक्षण सोडत कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य बशीर खाँदू, सुरेश पानस्कर, सुरेशनाना पाटील, राजाभाऊ काळे, नंदकुमार सुर्वे, राजेंद्र साळुंखे आदींसह जिल्हा परिषद, पंचायत समितीचे माजी सदस्य, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# येरवड्यात सवलतीच्या दरात जलतरण तलाव सुविधा; आ.पठारेंच्या आरोग्यदायी उपक्रम

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१३, पुणे (येरवडा) :** वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्या पुढाकारातून नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी आणि क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी सवलतीच्या दरात जलतरण तलावाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. येरवडा येथील विभागीय क्रीडा संकुलात 'चॅम्पियन पूल्स'च्या माध्यमातून ही सुविधा नागरिकांसाठी खुली करण्यात आली असून या उपक्रमामुळे नागरिक, विद्यार्थी तसेच कर्मचारी वर्गासाठी पोहण्याचे प्रशिक्षण घेण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. या योजनेअंतर्गत पोहण्याचे प्रशिक्षण व वार्षिक सदस्यत्वावर तब्बल ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ही सवलत महानगरपालिका कर्मचारी, कॉर्पोरेट कर्मचारी तसेच १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे. त्यामुळे अल्प दरात उत्तम प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना पोहण्याचे प्रशिक्षण घेता येणार आहे.

या उपक्रमाबद्दल आमदार बापूसाहेब पठारे यांनी सांगितले की, आरोग्यदायी जीवनशैली घडवणे आणि नागरिकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजवणे हा या उपक्रमाचा मूळ हेतू आहे. नागरिकांना जलतरण तलावाचा लाभ मिळावा, त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी आणि नव्या दमाचे जलतरणपटू तयार व्हावेत, यासाठी ही सवलत देण्यात आली आहे. पुण्यातील नागरिकांमध्ये फिटनेस आणि क्रीडा उपक्रमांविषयी वाढत असलेली जागरूकता लक्षात घेता हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरणार आहे. सवलतीचा लाभ घेण्यासाठी आधारकार्डसह विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र, कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांनी संस्थेचे ओळखपत्र आणि महानगरपालिकेचे कर्मचारी यांनी पालिकेचे ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. चॅम्पियन पूल्सच्या वतीने नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे येरवडा परिसरात आरोग्य आणि क्रीडा संस्कृतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.



# मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि सामाजिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल- सरन्यायाधीश गवई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, रत्नागिरी :** मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस.पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे अनावरण करण्यात आले. यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचे ही उद्घाटन आणि पाहणी सरन्यायाधीशांनी यावेळी केली.त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात झालेल्या समारंभात मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, आजचा महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे.

न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम माझ्या २२ वर्षाच्या सेवेमधील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत मंडणगड येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मंडणगड न्यायालयाच्या भूमिपूजनाला आम्ही दोघे उपस्थित होतो आणि आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही आम्ही दोघे उपस्थित आहोत. हा गौरवाचा क्षण आहे.

महाराष्ट्र शासन विशेषत: विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार



मानतो, त्यांनी मला या इमारतीच्या उद्घाटनाची संधी दिली.अवघ्या २० दिवसात कोल्हापूर येथील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. नाशिक, नागपूर, मंडणगड येथील इमारती पहा. विविध तालुक्यातील न्यायालयांच्या इमारती, माझ्या दर्यापूर तालुक्यातील इमारत पहा. मी अभिमानाने सांगू शकतो, देशातील कुठल्याही तालुक्यामध्ये या स्तरीची न्यायालये असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती देशातल्या कुठल्याही तालुक्यात असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती महाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ०८ ऑक्टोबर २०२३ रोजी सरन्यायाधीश गवई आणि मी या न्यायालयाचे भूमिपूजन केले. दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशय सुंदर इमारत उभी केली आहे. कोल्हापूरचे खंडपीठ झाले, सरन्यायाधीश गवईंच्या नेतृत्वात आणि सल्लयाने हा प्रवास २०१४ पासून सुरु झाला. न्यायालय आणि राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून ते लक्ष देत आहेत. सातत्याने त्यांचे लक्ष राहीले होते. २०१४ ते २०२५ पर्यंत जवळपास दीडशे न्यायालये आणि इमारतींना मान्यता दिली आणि त्याचे काम सुरु केले. त्यातील अनेक इमारती पूर्ण केल्या आहेत. याचे श्रेय सरन्यायाधीश गवई यांना जाते. सातत्याने राज्य शासना बरोबर संवाद करुन आणि त्यातील अडचणी दूर करुन आमच्याकडून या सगळ्या गोष्टी करवून घेतल्या. मी वकील असल्यामुळे उपमुख्यमंत्री असताना विधी व न्याय हा विभाग माझ्याकडे मागून घेतला होता.

उपमुख्यमंत्री शिंदे हे मुख्यमंत्री असताना २९ वेगवेगळ्या न्यायालयीन पायाभूत सुविधांना मान्यता दिली.चिपळूण न्यायालय इमारतीची केलेली मागणी तत्काळ मंजूर करु. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील स्मारकाच्या आराखड्याला वेग देण्याचे काम करू, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंडणगडचे न्यायालय हे अतिशय महत्त्वाचे आहे. या न्यायालयामुळे चार- साडेचार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती ठिकाण असणार आहे. यामुळे लोकांचा प्रवास, पैसा वाचणार आहे. ही केवळ इमारत नसून, लोकांकरिता न्यायदानाची एक गतीशील व्यवस्था तयार झाली आहे. याचे १०० टक्के श्रेय सरन्यायाधीश गवई यांचे आहे. प्रलंबित खटले वेगांनी निकाली निघतील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला सुंदर संविधान दिले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता देखील आहे आणि प्रत्येकाला न्याय देखील आहे.

राज्य शासन म्हणून ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, वंचिताना न्याय देण्यासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्य वेचले, त्यांचा पुर्णाकृती पुतळा या न्यायालयात आहे. न्यायाचे हे मंदिर आहे, घटनेचे मंदिर आहे. याची जाणीव हा पुतळा करुन देईल. या इमारतीचे भूमिपूजन आणि उद्घाटन देखील सरन्यायाधीशांच्या हस्ते झाले. यातून शासन विशेषत: सार्वजनिक बांधकाम विभाग सक्षम असल्याचे दाखवून दिले आहे. समाजातील शेवटच्या घटकातील माणसाला न्याय मिळाला पाहिजे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संकल्पना होती.

आज या इमारतीसाठी काम करणाऱ्या कामगांराचा सरन्यायाधीशांच्या हस्ते सत्कार करुन ती पूर्ण झाली आहे. न्याय गावा, गावांमध्ये मिळाला पाहिजे ही दूरदृष्टी सरन्यायाधीशांची आहे. सर्व सामान्यांमधले असामान्य कर्तृत्ववान व्यक्तीमत्त्व आणि भारतीय न्याय व्यवस्थेचे ते भूषण आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय पोहचविण्याचे काम न्यायालय करत असतं. म्हणून न्यायालयांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये आम्ही काटकसर करत नाही. या मंदिरातून सर्वसामान्यांना न्याय मिळून खटले लवकर निकाली निघतील, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री डॉ.सामंत म्हणाले, ४० हजार लोकवस्तीच्या गावात दिवाणी व फौजदारी न्यायालय असणारे देशात एकमेव मंडणगड असावे. खेडला सेशन कोर्टाला नवीन न्यायालय बांधावे, चिपळूण न्यायालयासाठीचा प्रस्ताव पाठवला आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. आंबडवे गावच्या स्मारकाचा आराखडा तयार झाला आहे. तो पूर्ण करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, न्यायमूर्ती कर्णिक यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. पालक न्यायमूर्ती जामदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर वकील संघाचे अध्यक्ष लोखंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, संविधान उद्देशिका आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. दीप प्रज्जवलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास वकील, पक्षकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

### जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना पाठविले निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१३, पालम (परभणी) :** सर्वोच्च न्यायालयाचे माननीय सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने निषेध व्यक्त केला. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सदरील निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असून या निवेदनात सदर हल्ल्यात आरोपी वकील राकेश किशोर यांनी सरन्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाचा तसेच भारतीय लोकशाही, संविधानाचा जाणीवपूर्वक अवमान केला आहे. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करण्यात यावी. अशा प्रकरणाच्या घटनांवर भविष्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष उमेश गायकवाड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य सरचिटणीस सतीश कांबळे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे ज्येष्ठ नेते अण्णासाहेब जल्हारे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हा सहसचिव राजू कांबळे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक विश्वनाथ झोडपे, इत्यादी उपस्थित होते.

## व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी लोणकर केंद्राचे कार्य प्रेरणादायी - आ.जोरगेवार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** स्व.गुलाबराव लोणकर प्रतिष्ठान संचालित लोणकर व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र, हिंगणाळा या केंद्राचा पहिला वर्धापन दिन सोहळा दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांशी संवाद साधत व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी या केंद्राचे कार्य हे अत्यंत प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाला कुसुम लोणकर, मानसिक रोग तज्ज्ञ डॉ.किरण देशपांडे, डॉ.पवन मालुसरे, डॉ.अतुल शेंद्रे, भारतीय जनता पार्टीचे महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, सुरेश पचारे, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री रवी गुरनूले यांच्या सह इतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ.जोरगेवार म्हणाले की, व्यसन ही व्यक्तीचे, कुटुंबाचे आणि समाजाचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी साखळी आहे. मात्र, या केंद्राच्या माध्यमातून अनेकांना नवजीवन मिळाले आहे. व्यसनाच्या जाळ्यात अडकलेल्या व्यक्तींना सुसंस्कृत आणि निरोगी जीवनाकडे नेण्याचे प्रामाणिक कार्य हे केंद्र करत असून, ते समाजासाठी अनुकरणीय आहे. यावेळी त्यांनी या केंद्रातील डॉक्टर, समुपदेशक, स्वयंसेवक तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी यांचे कौतुक करत म्हटले की, आपण करत असलेले हे कार्य केवळ सेवा नाही, तर ते समाजाप्रती असलेले ऋण फेडण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. या कार्यक्रमात व्यसनमुक्त झालेल्या काही व्यक्तींनी आपल्या अनुभवांचे कथन केले. त्यांच्या कथांमधून व्यसनमुक्ती केंद्राच्या कार्याचा समाजावर झालेला सकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून आला.

## मिरा-भाईंदरमध्ये होतोय नागरिकांना प्लास्टिक तांदळाचा पुरवठा

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१३, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर क्षेत्रातील काही शिधावाटप केंद्रांमध्ये अवैध प्लास्टिक तांदूळ साठवून त्याचा पुरवठा करण्यात येत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या आरोग्य व जीवितास गंभीर धोका निर्माण करणारे आहे. शिधावाटप योजनेंतर्गत नागरिकांना दिला जाणारा तांदूळ हा खाद्यपदार्थ म्हणून उपभोगासाठी असतो. अशा परिस्थितीत प्लास्टिक मिश्रित अथवा कृत्रिम तांदळाचा साठा व पुरवठा हा जनतेच्या आरोग्याशी खेळ करणारा गुन्हा असून, संबंधित केंद्र चालक व पुरवठादार यांच्यावर तात्काळ तपास करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सदर घटनेची नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करून निष्कर्ष जाहीर करण्यात यावा, जेणेकरून सत्य परिस्थिती नागरिकांसमोर स्पष्ट होईल. आपली तत्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी, ही मागणी मिरा भाईंदर जिल्हा काँग्रेस प्रवक्ता रवि खरात ह्यांनी प्रशासनास केले.

## चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमात दिवाळी फराळाचे वाटप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नवी मुंबई :** नेरुळ येथील गीत गजानन भजनी मंडळ आणि यूथकौन्सिल नेरुळ या सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे औचित्य साधून दिवाळी फराळाचे वाटप व इतर खाऊचे वाटप करण्यात आले. वसतीगृहात एकूण ३९ विद्यार्थी वास्तव्यास आहेत. मंडळाच्या श्रीमती शैलजाताई केळकर यांनी लाडू आणि चिवडा स्वतः घरी बनवून आणला होता. याप्रसंगी मंडळाच्या, संगीत क्षेत्रातील नामांकित तज्ञ शिक्षक श्रीमती अपर्णाताई दाबके, श्रीमती रेखाताई वाळवेकर, श्रीमती स्वातीताई पालकर तसेच यूथकौन्सिलचे पदाधिकारी सुभाष हांडे देशमुख, दत्ताराम आंब्रे, दिलीप चिंचोळे, सूर्यकांत गावडे, रवींद्र कांबळे अंकुश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमांतर्गत पर्यावरणाचे भान राखून आश्रमाच्या परिसरात फणस व जांभूळ या फळझाडांचे रोपण करण्यात आले.वसतीगृहातील विद्यार्थ्यांची व्यवस्था पाहणारा अमित भुरबुडा यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या दिनक्रमाची माहिती सविस्तरपणे सर्वांना दिली. मुलांनी स्वागत गीत, देशभक्तीपर गीते सादर करुन तसेच विविध प्राण्यांचा आवाज काढून दाखवून आपापल्या कला सादर केल्या. संस्थेतील संपूर्ण वातावरण, शिस्त, मुलांची अभ्यासातील प्रगती पाहून उपस्थित पाहुणेमंडळींनी समाधान व्यक्त केले. भजनी मंडळाच्या श्रीमती अपर्णाताई दाबके यांनी मुलांना हीच आमुची प्रार्थना हे गीत शिकवले आणि त्यांच्याकडून सामूहिकरित्या वदवूनही घेतले.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष हांडे देशमुख यांनी केले तर शेवटी श्रीमती रेखाताई वाळवेकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.